# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## Savitribai Phule Pune University
Formerly Pune University

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
गणेशखिंड, पुणे—४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०—२५६२१०४८/९
ई—मेल : iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ - www.unipune.ac.in

Internal Quality Assurance Cell
Ganeshkhind, Pune – 411007
Contact No. : 020-25621048/9
E-mail - iqac@unipune.ac.in
Website – www.unipune.ac.in


अंगुहक/४५४/२०२५ दिनांक — १८ /११/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/मा. नोडल अधिकारी,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
व नॉन एआयसीटीई अभ्यासक्रम सुरू असलेल्या संस्था,
पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हे व दादरा नगर हवेली,
प्रस्तत विद्यापीठ.

विषय — **Management Information System (M.I.S.) शैक्षणिक वर्ष २०२५— २६ च्या माहितीबाबत.**

संदर्भ — उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२५—२६/E/२३३३०६४ — मा. शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २७/१०/२०२५ रोजीचे कार्यालयीन पत्र.
मा. सांख्यिकी अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १७/११/२०२५ रोजीचे कार्यालयीन ईमेल.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयांस अनुसरून कळविण्यात येते की, प्रतिवर्षाप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०२५—२६ या शैक्षणिक वर्षाची सांख्यिकी माहितीची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलंग्न असलेल्या पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हे व दादरा नगर हवेली, या केंद्र शासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांना **गुरूवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२५ पासून** एक्सेलशीट्स महाविद्यालयांच्या वेबमेलवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्या एक्सेलशीट्समध्ये सुधारणा करून सुधारित एक्सेलशीट्स सोमवार, दि. १७ नोव्हेंबर, २०२५ पासून महाविद्यालयांच्या वेबमेलवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये/पूर्वी ज्या महाविद्यालयांना राज्य सरकारकडून मान्यता व प्रस्तुत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग ( संलंग्नता कक्ष) यांच्याकडून संलंग्नीकरण मिळालेले आहे अशा सर्व महाविद्यालयांनी वेबमेलवर विद्यापीठाकडून प्राप्त एक्सेलशीट्समध्ये महाविद्यालयाची पूर्ण सांख्यिकी माहिती अचूक व बरोबर भरणे बंधनकारक आहे. तसेच सर्व संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून प्राप्त एक्सेलशीट्समध्ये महाविद्यालयाची पूर्ण सांख्यिकी माहिती अचूक व बरोबर भरून शासनास

dhemisdata6@gmail.com या ईमेल आयडी वर पाठविणे बंधनकारक असून त्याची एक प्रत विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षामध्ये पेन ड्राईव्हमध्ये सादर करावी.

सर्व संबंधित महाविद्यालयांनी सन २०२५—२६ या शैक्षणिक वर्षाची अचूक व बरोबर सांख्यिकी माहिती उपरोक्त नमूद केलेल्या ठिकाणी सादर केल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून विहित मुदतीत ना—हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे याची सर्व संबंधित महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/ मा. नोडल अधिका—यांनी नोंद घ्यावी.

सदर माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी **शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर, २०२५** पर्यंत पूर्ण माहिती भरणे बंधनकारक असून लवकरात लवकर पूर्ण करून सहकार्य करावे ही विनंती. या सदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता कक्ष, ०२०—०२५६२१०४८/४९/५१ व ०२०—२९७०७०९३ सांख्यिकी विभाग, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

आपला,

प्रा. डॉ. विनायक जोशी
संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष